**आदिवासी उपयोजनेंतर्गत क्षेत्र विकास/ मुलभूत सुविधांच्या योजना राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना...**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : टिएसपी-२००५/प्र.क्र.५९/का.६**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- 10, नोव्हेंबर २००५.**

**वाचा :-**

(१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक टिएसपी-१०९१/ प्र.क्र.११/का.६, दिनांक २१ सप्टेंबर, १९९२.

(२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक टिएसपी-१०९३/ प्र.क्र.७७/का.६, दिनांक २४ जानेवारी, १९९४.

(३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग,क्रमांक टिएसपी-२००३/ प्र.क्र.१०१/ का.६, दिनांक २६ जुलै २००४

**प्रस्तावना :-** उपरोक्त संदर्भात नमूद केलेल्या अ.क्र.(३) येथील दिनांक २६.७.२००४ च्या शासन निर्णयानुसार आदिवासी उपयोजनेंतर्गत क्षेत्र विकास/मूलभूत सुविधांच्या योजना राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णय निर्गमित करण्याचा शासनाचा मुख्य उद्देश दुर्गम व आदिवासी बहुल भागाच्या परिपूर्ण विकासावर प्राथम्याने लक्ष केंद्रीत करण्याचा आहे. त्यासाठी ज्या भागात योजना/कार्यक्रम राबवावयाचे आहेत त्या भागातील आदिवासी लोकसंख्या व लघु पाटबंधाऱ्याच्याबाबतीत प्रकल्पांतील लाभार्थ्यांचे कार्यक्षेत्र विचारात घेऊन योजना राबविणे हा मुख्य निकष ठेवण्यात आला होता. काही विकासशीर्षाखालील योजना राबविताना आदिवासी भागातील उपरोक्त दिनांक २६.७.२००४ च्या शासन निर्णयान्वये घालण्यात आलेली आदिवासी लोकसंख्येचे बंधन विकास प्रक्रीयेत आड येत असल्याचे लोकप्रतिनिधीनी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. त्यामुळे दिनांक २६ जुलै २००४ च्या शासन निर्णयात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. आता दिनांक २६ जुलै २००४ चा शासन निर्णयात खालीलप्रमाणे अंशतः सुधारणा करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-** आदिवासी उपयोजनेचे आकारमान निश्चित झाल्यानंतर आदिवासी उपयोजनेसाठी उपलब्ध झालेल्या नियतव्ययाचे वाटप प्रथमतः खालीलप्रमाणे करण्यात यावे.

(१) आदिवासी उपयोजनेला उपलब्ध झालेल्या नियतव्ययापैकी ७०% व्यय जिल्हा योजनांसाठी व ३०% व्यय राज्यस्तरीय योजनांसाठी राखून ठेवण्यात यावा.

(२) जिल्हा योजनांसाठी उपलब्ध झालेल्या व्ययापैकी ८५% निधी आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी व १५% निधी आदिवासी उपयोजना बाहय क्षेत्रासाठी राखून ठेवण्यात यावा. आदिवासी उपयोजना क्षेत्रात १) अनुसूचित क्षेत्र २) अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र व ३) माडा व मिनीमाडा क्षेत्राचाही समावेश आहे.

(३) आदिवासी उपयोजना क्षेत्रास उपलब्ध झालेल्या तरतूदीतून ८०% तरतूद मुलभूत सुविधांसाठी व २०% तरतूद वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी वापरण्यात यावी.

(४) आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रामध्ये फक्त वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात याव्यात.

२. आदिवासी उपयोजना क्षेत्रात विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या क्षेत्रविकास/मुलभूत सुविधांच्या योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात घालून देण्यात आलेल्या निकषात अंशत: सुधारणा करण्यात येत आहे :-

(१) संदर्भाधिन दिनांक २६.७.२००४ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे ८०% हून अधिक आदिवासी लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये योजना राबविण्यासाठी आदिवासी उपयोजनेतून १००% निधी प्राथम्याने उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर गावांतील योजनांना प्राथम्याने निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर शिल्लक निधी असल्यास ५१% हून अधिक आदिवासी लोकसंख्या असलेल्या गावांतील योजनांना १००% निधी आदिवासी उपयोजनेतून उपलब्ध करुन देण्यात येईल.

(२) दुर्गम व अतिमागास भागातील आदिवासींची उन्नती व्हावी म्हणून प्रकल्पाची/योजनेची गुणवत्ता लक्षात घेवून अशा गावांतील आदिवासींची लोकसंख्या ५०% व त्यापेक्षा कमी असली तरी एक विशेष बाब म्हणून खालील विकास शिर्षांच्या बाबतीत लोकसंख्येची अट शिथील करण्याचे अधिकार शासनास रहातील :-

(अ) लघुपाटबंधारे (लोकसंख्या व लाभक्षेत्र या दोन्ही अटींचे शिथीलीकरण)
(ब) रस्ते
(क) पाणी पुरवठा
(ड) विद्युत विकास
(ई) प्राथमिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे
(फ) औद्योगिक प्रशिक्षण संस्था

(३) वरील विकास शिर्षांतर्गत लोकसंख्येची व आवश्यक तेथे क्षेत्राची अट शिथिल करुन कार्यान्वित करावयाचे प्रस्ताव मंजुरीसाठी संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प/अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्यामार्फत योग्य त्या

समर्थनासह सादर करावेत. लोकसंख्येची अट शिथील केल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार आदिवासी उपयोजनेतून निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

(४) लोकसंख्येची अट शिथील करुन कार्यान्वित करावयाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी आदिवासी विकास विभागाची संमती आवश्यक असेल.

(५) दिनांक २६.७.२००४ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या योजना आदिवासी उपयोजनेतून ज्या गावामध्ये /गावांसाठी राबवावयाच्या असतील त्या योजनांच्या/प्रकल्पांच्या प्रस्तावासोबत सदर गावातील आदिवासी लोकसंख्येच्या व लघुपाटबंधाऱ्याच्या बाबतीत प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रापैकी आदिवासी लाभार्थ्यांच्या कार्यक्षेत्राच्या टक्केवारी बाबतचे प्रमाणपत्र संबधित क्षत्राचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प/अपर आयुक्त,आदिवासी विकास यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन प्रस्तावासोबत जोडणे अनिवार्य करण्यात येत आहे.

(६) लोकसंख्येच्या अधिक्याच्या क्रमानुसारच कामे प्रस्तावित केली आहेत, असे प्रमाणपत्र संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प/अपर आयुक्त, आदिवासी विकास यांनी देणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( कृ.मा.पवार )**
**सह सचिव,**
**आदिवासी विकास विभाग.**

प्रति,
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
नियोजन विभाग,
पाटबंधारे विभाग,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शालेय शिक्षण विभाग,
सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य, क्रिडा व युवक सेवा विभाग,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा),
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
कृषि व पदुम विभाग,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
महिला व बालकल्याण विभाग,

उर्वरित सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.
सर्व विभागीय आयुक्त.
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
कृषि आयुक्त, पुणे.
आयुक्त, पशुसंवर्धन, पुणे.
आयुक्त, मत्स्यव्यवसाय विकास, मुंबई.
आयुक्त,एकात्मिक बालविकास कार्यक्रम,नवी मुंबई

अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग, ठाणे/नाशिक/पुणे/अमरावती/अहमदनगर/चंद्रपूर/नांदेड/ नागपूर/यवतमाळ/अकोला.
अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग (स्था.स्त.), ठाणे/नाशिक/और[illegible]/पुणे/नागपूर/अमरावती
अधिक्षक अभियंता, तापी पाटबंधारे महामंडळ,
अधिक्षक अभियंता, विदर्भ पाटबंधारे महामंडळ,
अधिक्षक अभियंता, गोदावरी पाटबंधारे महामंडळ,
अधिक्षक अभियंता, कृष्णा पाटबंधारे महामंडळ,
संचालक, शिक्षण (प्राथमिक/माध्यमिक),पुणे.
संचालक, क्री डा, पुणे.
अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,ठाणे/नवी मुंबई/पुणे/अहमदनगर/धुळे/नांदेड/ अमरावती /चंद्रपुर/नागपूर/यवतमाळ/जळगांव
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवीमुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण, मुंबई.
महासंचालक, आरोग्य, मुंबई.
सहसंचालक, आरोग्य सेवा, पुणे.
सहसंचालक, हिवताप व हत्तीरोग, पुणे.
उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व आदिवासी व माडाक्षेत्र जिल्हे)
सर्व जिल्हा शल्य चिकीत्सक (सर्व आदिवासी व माडाक्षेत्र जिल्हे)
संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई.
संचालक, व्यवसाय शिक्षण, मुंबई.
अपर आयुक्त,आ.वि.ठाणे/नाशिक/नागपूर/अमरावती
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परीषद
इतर मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील विभागप्रमुख.
सह/उप सचिव,आ.वि.वि.
सर्व कार्यासने,आ.वि.वि.
सर्व प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
निवड नस्ती,का.६,आ.वि.वि.

C:\WINDOWS\Desktop/C R 101 OF 2003 1 D6 1